# क था मृ त

[ गीता-प्रवचनादींत आलेल्या कथांचा संग्रह ]

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १२९६

विनोबा

परंधाम विद्यापीठ प्रकाशन

# अनुक्रमणिका


| नांव | पृष्ठ |
|---|---|
| १ मोहजन्य तत्त्वज्ञान | १ |
| २ तीन 'द' कार | २ |
| ३ फलत्यागाचे दोन प्रकार | २ |
| ४ अधिकार तैसा करुं उपदेश | ४ |
| ५ न मागे तयाची रमा होय दासीं | ५ |
| ६ कर्म ही च पूजा | ६ |
| ७ सारी साखर च साखर | ७ |
| ८ कोरें पत्र | ९ |
| ९ चित्ताची एकाग्रता | १० |
| १० जशी दृष्टि तशी सृष्टि | ११ |
| ११ देवापाशीं मागणें चांगलें | १२ |
| १२ मरणाचें स्मरण | १२ |
| १३ सत्पात्र कसें ओळखावें | १४ |
| १४ परमेश्वर भावनेंतील दिव्य दृष्टि | १५ |
| १५ कृष्णार्पणाचा चमत्कार | १६ |
| १६ मूर्तिपूजेचें रहस्य | १७ |
| १७ सर्वत्र हरि-दर्शन | १८ |
| १८ लक्ष्मणाची सगुण भक्ति | २३ |
| १९ भरताची निर्गुण भक्ति | २४ |
| २० उद्धव आणि अर्जुन यांची गोष्ट | २५ |
| २१ 'मी' म्हणजे देह नव्हे | २७ |

| नांव | पृष्ठ |
|---|---|
| २२ नित्य-नवीनतेची गोडी | ३० |
| २३ पुरुषोत्तमाचें सर्वत्र दर्शन | ३१ |
| २४ दोषांतून सुटण्याची युक्ति | ३२ |
| २५ त्याग आणि दान यांतील फरक | ३४ |
| २६ माणूस आणि घोडा | ३५ |
| २७ राक्षस आणि माणूस | ३६ |
| २८ कल्पवृक्षाची गोष्ट | ३७ |
| २९ शंकर, पार्वती, आणि नंदी | ३८ |
| ३० श्रीमंताचा पोर आणि पृथ्वीभर चामडें | ३८ |
| ३१ नारदाची पृथ्वी-प्रदक्षिणा | ३९ |
| ३२ दहावा हरवला | ४० |
| ३३ राजाचा यज्ञ आणि दूध | ४० |
| ३४ टीकाकाराची गोष्ट | ४१ |
| ३५ दुर्वर्तनी बाई आणि ख्रिस्ती | ४२ |
| ३६ साधु आणि तलवार | ४२ |
| ३७ शतकोटि रामायणाची वाटणी आणि शंकर | ४३ |
| ३८ औषध आणि कुदळ | ४४ |
| ३९ युक्लिड आणि राजा | ४४ |
| ४० चांडाळाची गोष्ट | ४५ |

# कथामृत

[ गीता-प्रवचनादीत आलेल्या कथांचा संग्रह ]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

विनोबा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ११५०९

किंमत ३७ नये पैसे

परंधाम विद्यापीठ प्रकाशन

# प्रास्ताविक

विनोबांच्या लिखाणांतून आणि व्याख्यानांतून विषय समजावून सांगतांना अनेक उद्‌बोधक, मनोरंजक आणि मार्मिक गोष्टींचें रत्नभांडार भरलेलें असतें. गीतेसारख्या आध्यात्मिक आणि गहन ग्रंथावरील त्यांचीं प्रवचनें हि किती सोपी, सुटसुटीत आणि रसाळ वाटतात ! गीतेंत सांगितलेल्या विषयांचें चिंतन, मनन, आणि आचरण त्यांनीं केलें असल्यामुळें अनुभवाच्या बोलांचें मोल त्या प्रवचनांना आलें आहे. आणि त्याच्या जोडीला समर्पक कथांची, उदाहरणांची, आणि दृष्टांतांची ठाई ठाई पखरण केली असल्यामुळें वाचतांना तीं सोललेल्या केळ्याप्रमाणें अलगद गळीं उतरतात.

तीं कथा-सुमनें वेंचून त्यांची एके ठिकाणीं माळ गुंफली तर बाल-बालिका नवसाक्षर यांच्याबरोबर इतरे जनांची हि सोय होईल या कल्पनेनें गीता प्रवचनें आणि मधुकर या ग्रंथांतून सदर कथा निवडून काढल्या आहेत, कथेच्या मागें पुढें विषयानुकूल अल्पसा साज आम्हीं केला आहे परंतु त्यानें मूळ कथेला बाध येणार नाहीं अशी काळजी घेतली आहे.

प्रत्येक कथेला एखादें अनुरूप चित्र जोडतां आलें असतें तर बालमनाची या कथांनीं अधिक पकड घेतली असती. परंतु तें पुढें केव्हां तरी.

—प्रकाशक

दा. क. ११५०१
ग्रंथ शाखा संग्रह प्रत

## मोहजन्य तत्त्वज्ञान



स्वधर्माचें आचरण करीत असतांना मनुष्याच्या जीवनांत कित्येकदां नाजुक पेंच निर्माण होत असतात. स्वतःच्या किंवा स्वकीयांच्या संबंधांत हा पेंच असला तर अधिक च जड जातें. हा पेंच बहुधा आसक्तिमूलक च असतो. परंतु या आसक्तीचें नागडें दर्शन मनुष्याच्या मनाला आवडत नाहीं. अशा वेळीं आपल्या या मोहजन्य पेंचाला तो एखादें तत्त्वज्ञान जोडूं पाहतो. आणि मग पुढील न्याया-धीशासारखी अवस्था होते.

एक होता न्यायाधीश. शेंकडो अपराध्यांना त्यानें फांशीची शिक्षा दिली होती. परंतु एके दिवशीं त्याचा स्वतःचा मुलगा खुनी म्हणून त्याच्यासमोर उभा करण्यांत आला. त्याच्यावरचा खुनाचा आरोप सिद्ध होऊन त्याला फांशीची शिक्षा देण्याची न्यायाधीशावर पाळी आली. पण तसें करतांना तो न्यायाधीश कचरला. तो बुद्धिवाद बोलूं लागला. "फांशीची शिक्षा अमानुष आहे. ती देणें मनुष्याला शोभत नाहीं. मनुष्याला सुधारण्याची आशा त्यामुळें नष्ट होते. खून करणारानें भावनेच्या भरांत खून केला. परंतु त्याच्या डोळ्यांवरचा खून उतरल्यावर त्या माणसाला गंभीरपणें उचलून फांसावर लटकवून मारावयाचें हें समाजाच्या माणुसकीला लाजिरवाणें व काळीमा फासणारें आहे."

न्यायाधीशाचा हा युक्तिवाद आंतरिक नव्हता. 'हा माझा मुलगा' या ममत्वांतून निर्माण झालेलें तें वाङमय होतें.

———

## तीन ‘द’ कार

: २ :

गुरूनें केलेल्या उपदेशाचा शिष्य आपापल्या भूमिकेवरून अर्थ लावीत असतात. एका च मंत्राचा अधिकार-भेदानें आणि अनुभव-भेदानें वेगवेगळा अर्थ लावतां येतो आणि ते सारे अर्थ त्या त्या व्यक्तीसाठीं उपकारक च ठरतात. यासंबंधीं उपनिषदांत एक सुंदर गोष्ट आहे.

एकदां देव, दानव, आणि मानव, प्रजापतीकडे उपदेशार्थ गेले. प्रजापतीनें तिघांना ‘द’ हें एक च अक्षर दिलें. देव म्हणाले,—“आम्ही देव कामी, भोगाला चटावलेले. आम्हांला ‘द’ अक्षरानें ‘दमन करा’ असें प्रजापतीनें शिकविलें.” दानव म्हणाले,—“आम्ही दानव क्रोधी, दयेला पारखे झालेले. आम्हांला ‘द’ अक्षरानें ‘दया करा’ असें प्रजापतीनें शिकविलें.” मानव म्हणाले,—“आम्ही मानव लोभी, संचयाच्या मागें लागलेले. आम्हांला ‘द’ अक्षरानें ‘दान करा’ असें प्रजापतीनें शिकविलें.”

प्रजापतीनें तिघांचे हि अर्थ बरोबर मानले. कारण त्यांना ते स्वानुभवांतून लाभले होते.

---

## फलत्यागाचे दोन प्रकार

: ३ :

मनुष्याची साधना पूर्णावस्थेला येऊं लागली म्हणजे त्याच्या-समोर दोन प्रकारचीं प्रलोभनें उभीं राहतात. एक प्रलोभन म्हणजे त्या साधनेंतून लाभणारी ऐहिक सिद्धि. आणि दुसरें प्रलोभन म्हणजे प्रत्यक्ष आराध्य दैवत च निष्ठेची कसोटी करण्यासाठीं

विलोभनीय रूपांत प्रगट होणें. परंतु निष्काम कर्मयोग्याला तें कर्म च सर्वस्व असतें.

या बाबतींतलीं दोन उदाहरणें पाहण्यासारखीं आहेत. पहिल्या प्रकारचें उदाहरण तुकारामाचें.

एकदां तुकारामाची भक्ति पाहून शिवाजी महाराजांनीं त्याच्याकडे दिवटया, छत्री, घोडे, पालखी वगैरे पाठवून त्याचें स्वागत आरंभिलें. तें पाहून तुकारामाला वाटलें कीं मान-सन्मानाचें फळ हातांवर ठेवून देव जणूं आपणांस दूर करूं पाहत आहे. ते देवाला म्हणाले,

**जाणूनि अंतर । टाळिशील करकर**
**तुज लागली हे खोडी । पांडुरंगा बहु कुडी**

'देवा, तुला मोठी वाईट खोड लागली आहे. चिरिमिरी देऊन माझी ब्याद घालवूं पाहत असशील तर मी कच्चा नाहीं. तुझे पाय घट्ट धरून ठेवीन.' भक्ति हा च भक्तांचा स्वधर्म असल्या-मुळें तिला अवांतर फळांचे फाटे फुटलेले भक्ताला सहन होत नाहींत.

हा झाला प्रलोभनाचा एक प्रकार. आतां दुसरा प्रकार पुंडलिकाच्या बाबतींतला.

पुंडलिक आईबापांची सेवा करीत होता. त्या सेवेनें प्रसन्न होऊन पांडुरंग त्याच्या भेटीला धांवून आले. परंतु पांडुरंगाच्या नादीं लागून हातांतील सेवा सोडण्याचा त्यानें इन्कार केला. आई-बापांची ती सेवा पुंडलिकाची जिव्हाळ्याची ईश्वरभक्ति होती. देवाची मूर्ति समोर उभी राहिली खरी. पण तो च का तेवढा परमेश्वर ? तें रूप दिसण्यापूर्वीं सृष्टि का मढें होती ? पुंडलीक

देवाला म्हणाला--'देवा, तूं माझ्या भेटीसाठीं आला आहेस हें मीं ओळखिलें. पण मी 'हि-सिद्धांत' मानणारा आहें. तूं च देव हें मी कबूल करीत नाहीं. तूं हि देव आहेस आणि हे आईबाप हि मला देव आहेत. यांच्या सेवेंत असतांना तुझ्याकडे मला लक्ष देतां येत नाहीं याबद्दल तूं मला क्षमा कर." असें म्हणून देवाला उभें राहण्यासाठीं त्यानें एक वीट अंगणांत टाकली. यावर तुकाराम कौतुकानें आणि विनोदानें पुंडलिकाला म्हणतो.

**"कां रे प्रेमें मातलासी । उभें केलें विट्ठलासी**
**ऐसा कैसा रे तूं धीट । मागें भिरकाविली वीट"**

निष्काम कर्म-योग्याला वरीलपैकीं कोणतें हि प्रलोभन कर्म-योगापासून चाळवूं शकत नाहीं.

------

## "अधिकार तैसा करूं उपदेश" :४:

ज्याची जी भूमिका आणि अधिकार असतो त्याला त्याप्रमाणें उपदेश करून मार्गदर्शन करावें लागतें. आणि एखादे वेळीं असा उपदेश वरून वरून पाहिलें तर अगदीं एकमेकाच्या उलटा हि वाटूं शकतो, परंतु त्यांतील उद्दिष्ट एक च असतें.

एकदां एका साधूकडे एक गृहस्थ गेला आणि त्यानें साधूला विचारलें "मोक्षासाठीं घर सोडावें च लागतें काय ?" साधु म्हणाला, "कोण म्हणतो ? जनकासारख्यांनीं राजवाड्यांत राहून मोक्ष जोडला. मग तुला च घर सोडण्याची काय जरूर ?"

पुढें कांहीं दिवसांनीं दुसरा एक गृहस्थ त्या साधूकडे गेला आणि त्यानें साधूला विचारलें, "महाराज घर सोडल्याशिवाय

मोक्ष मिळूं शकतो काय ?" साधु म्हणाला, "कोण म्हणतो ? घरांत राहून सुखासुखी मोक्ष मिळता तर शुकासारख्यांनीं गृहत्याग केला ते काय मूर्ख होते ?"

पुढें या दोन्ही गृहस्थांची भेट झाली, व त्यांचें भांडण जुंपलें. एक म्हणे साधूनें घर सोडायला सांगितलें. दुसरा म्हणे 'घर सोडण्याची गरज नाहीं' असें साधूनें सांगितलें. शेंवटीं दोघे हि साधूकडे गेले आणि असें उलट सुलट कां सांगितलें म्हणून विचारूं लागले. साधु म्हणाला 'दोन्ही गोष्टी बरोबर आहेत. ज्याची जशी वृत्ति तसा त्याला मार्ग. मोक्षासाठीं घर सोडण्याची गरज आहे हि आणि नाहीं हि.' याला च म्हणायचें "अधिकार तैसा करूं उपदेश"

------

## "न मागे तयाची रमा होय दासी" : ५ :

मनुष्य सुखासाठीं आटापीटा करीत असतो परंतु सुख त्याच्यापासून दूर च पळत असतें. फळाच्या मागें धावूं लागलें कीं फळ पुढें धावूं लागतें. म्हणून सुखाचा किंवा फळाचा नाद सोडून स्वधर्म आचरीत राहिलें कीं तें सुख आणि तें फळ आपण होऊन आपल्या मागें धांवतें.

लक्ष्मीनें आपण स्वयंवर करणार असल्याचें जाहीर केलें. सारे देव दानव लक्ष्मीच्या आशेनें मंडपांत जमा झाले होते. स्वयंवराचा पण लक्ष्मीनें आधीं जाहीर केला नव्हता. सारे राजे महाराजे सभामंडपांत जमल्यानंतर लक्ष्मी मंडपांत आली आणि तिनें आपला पण जाहीर केला. ती म्हणाली, "ज्याला माझी इच्छा नसेल त्याला मी माळ घालणार आहें." जमलेले सारे लक्ष्मीसाठीं

लालचावलेले होते. मग लक्ष्मी निरिच्छ वर शोधीत निघाली. शेषावर शांत पडलेली भगवान् विष्णूची मूर्ति तिला दिसली. विष्णूच्या गळ्यांत माळ घालून त्याचे चरण चुरीत ती अद्याप बसली च आहे.

'**न मागे तयाची रमा होय दासी**' ही च तर खरी खुबी आहे.

------

## कर्म ही च पूजा : ६ :

कर्मयोगानें चित्तशुद्धि होते असें म्हणतात. परंतु हें कर्म इतर लोक करतात तसलें असत नाहीं. कर्मयोगी जें मंतरलेलें कर्म करतो त्यानें चित्तशुद्धि होते.

जाजलि नांवाचा एक ब्राह्मण तुलाधाराकडे ज्ञानप्राप्तीसाठीं गेला. तुलाधार त्याला म्हणाला, "बाबारे, या तराजूची दांडी ज्याप्रमाणें नेहमीं सरळ ठेवावी लागते त्याप्रमाणें मन सरळ ठेवण्यास मी शिकलों आहें." तराजूच्या दांडींतून तुलाधाराला समवृत्ति लाभली.

सेना न्हावी लोकांच्या डोकीवरचे केस काढी आणि त्यांना आरसा दाखवी परंतु तो मनांत म्हणे, "दुसऱ्यांच्या डोक्यावरचा मळ मी काढीत आहे खरा, पण माझ्या डोक्यांतला मळ मीं काढला आहे का?" माझें चित्त शुद्ध झालें आहे का?" वस्तरा आणि आरसा यांतून सेना न्हाव्याला चित्तशुद्धि लाभली.

गोरा कुंभार माती तुडवून समाजाला पक्कीं मडकीं देत असे. हातांत थापटणें घेऊन जमलेल्या संतमंडळींचीं डोकीं कच्चीं कीं पक्कीं हें तो तपासीत असे. परंतु आपल्या जीवनाचें मडकें हि

पक्कें झालें पाहिजे अशी तो मनांत खूणगांठ बांधी. मडकें आणि थापटणें यांतून गोरा कुंभाराला निरहंकारता लाभली.

अशा रीतीनें आपापल्या धंद्यांतून आमच्या संतांना भव्य आत्मज्ञान होत असे. याचें कारण त्यांचें कर्म उपासनामय, पूजारूप होतें हें होय.

------

## सारी साखर च साखर : ७ :

सगळ्या सृष्टींत एक च परमेश्वर भरलेला असला तरी वरच्या वेगवेगळ्या रूपामुळें आपण फसतों आणि भेद कल्पून घेतों. सोन्याच्या वेगवेळ्या दागिन्यांत एक च सोनें, परंतु आकार–भेदामुळें दागिन्यांत आवड नावड निर्माण होते. हा वरचा भेद बाजूला सारून ज्यांना आंतलें समान तत्त्व ओळखतां आलें त्यांना च ज्ञानी म्हणायचें.

एकदां शुकदेवांना व्यासमुनि म्हणाले, "बा शुका, तूं ज्ञानी आहेस. परंतु गुरूचा शिक्का तुझ्यावर बसला नाहीं. तूं जनकाकडे जा."

शुकदेव निघाले जनकाकडे. जनकराजा तिसऱ्या मजल्यावर दिवाणखान्यांत होते. शुक वनांत राहणारे. ते नगर पाहत पाहत चालले. जनकराजाजवळ पोंचल्यानंतर जनकानें शुकाला विचारलें,

"कां आलास ?"

ज्ञानासाठीं.

"कोणीं पाठविलें ?"

व्यासांनीं.

"कोठून आलास ?"

आश्रमांतून.

"आश्रमांतून येतांना वाटेंत काय काय दिसलें ?"

जिकडे तिकडे एक च साखरेची मिठाई मांडून ठेवलेली दिसली.

"आणखी काय ?"

चालते बोलते साखरेचे पुतळे पाहिले.

"पुढें काय पाहिलें ?"

येथें येतांना साखरेच्या टणक पायऱ्या लागल्या.

"पुढें काय ?"

साखरेचीं चित्रें येथें हि सर्वत्र पाहिलीं.

"आतां काय पाहतोस ?"

एक साखरेचा पुतळा दुसऱ्या साखरेच्या पुतळ्याशीं बोलत आहे.

हें ऐकल्यावर जनक राजा म्हणाले "जा, तुला सर्व ज्ञान मिळालें आहे."

जनकाच्या सहीचें प्रमाण-पत्र पाहिजे होतें तें मिळालें. कर्मयोगी जनकांनीं संन्यासी शुकदेवाला शिष्य म्हणून पास केलें.

------

## कोरें पत्र


देहधारी मनुष्याला सुलभतेच्या दृष्टीनें निर्गुणापेक्षां सगुण श्रेष्ठ असतें. परंतु पूर्णावस्थेंत सगुण निर्गुण दोन्ही एक च. एका प्रकारांत बाहेरून कर्माचें भूत नाचतांना दिसतें, पण आंत शांति असते. दुसऱ्यांत बाहेरून कांहीं न करतां त्रिभुवन हालवून सोडण्याची शक्ति असते. जसें दिसायचें तसें नसायचें हें दोघांचें स्वरूप.

ज्ञानदेवांकडे चांगदेवानें एक पत्र पाठविलें. कोऱ्या कागदाचें च तें पत्र. चांगदेवापेक्षां ज्ञानदेव वयानें लहान होते. 'चिरंजीव' असें लिहावें तर ज्ञानदेव ज्ञानानें श्रेष्ठ होते. 'तीर्थस्वरूप' लिहावें तर ज्ञानदेव वयानें लहान होते. मायना काय लिहायचा तें ठरेना, म्हणून चांगदेवानें कोरा च कागद पाठविला. तो कागद निवृत्तिनाथांच्या हातांत पडला. त्यांनीं तो कोरा कागद वाचला आणि ज्ञानदेवांच्या हातांत दिला. ज्ञानदेवांनीं वाचला आणि मुक्ताबाईस दिला. मुक्ताबाईनें तो वाचला आणि ती म्हणाली, "चांग्या, एवढा मोठा झालास तरी अजून कोरा च." निवृत्तिनाथांनीं त्या कोऱ्या कागदांत निराळा च अर्थ वाचला होता. ते म्हणाले, "चांगदेव कोरा आहे, शुद्ध आहे, निर्मळ आहे, उपदेश देण्यास योग्य आहे." असें म्हणून ज्ञानदेवास उत्तर देण्यास सांगितलें. ज्ञानदेवांनीं ६५ ओव्यांचें पत्र पाठविलें. त्याला चांगदेव-पासष्टी म्हणतात.

लिहिलेलें वाचणें सोपें आहे. पण न लिहिलेलें वाचणें कठिण आहे. त्यांतील वाचणें संपत च नाहीं.

## चित्ताची एकाग्रता : ९ :

व्यवहारांत आणि परमार्थांत हि चित्ताच्या एकाग्रतेवर च यशापयश अवलंबून आहे. व्यवहार शुद्ध करणें म्हणजे च परमार्थ.

नेपोलियनची अशी गोष्ट सांगतात कीं युद्धाची व्यवस्था एकदां नीट लावून दिली कीं तो समरभूमीवर गणिताचे सिद्धांत सोडवीत बसे. तंबूवर गोळे पडत, माणसें मरत, पण नेपोलियन गणितांत मग्न.

खलीफा उमरची गोष्ट सांगतात : लढाई चालू असतां प्रार्थनेची वेळ झाली कीं लगेच तो चित्त एकाग्र करून रणांगणांत गुडघे टेकून प्रार्थना करूं लागे. प्रार्थनेंत तो इतका एकाग्र होई कीं आसपास कोण माणसें कापलीं जात आहेत याचें त्याला भान हि नसे.

एक मुसलमान साधु होता. त्याच्या अंगांत बाण रुतला. त्या बाणामुळें फार वेदना होत होत्या. बाण काढायला जावें तर जास्त च वेदना होत. त्यावेळीं गुंगीचें औषध नव्हतें. साधूची माहिती ज्या लोकांना होती त्यांनीं आसपासच्या मंडळींना सांगितलें कीं "बाण काढणें तूर्त राहूं द्या. हा साधु प्रार्थनेस बसला म्हणजे तो बाण काढूं" सायंकाळीं साधु प्रार्थनेस बसला. आणि एका क्षणांत त्याची इतकी एकाग्रता झाली कीं तो बाण त्याच्या शरीरांतून केव्हां काढून घेतला हें त्याला कळलें हि नाहीं.

---

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों दि:

## जशी दृष्टि तशी सृष्टि

जगांत कांहीं च बिघडलेलें नसतें. जर कांहीं बिघडलेलें असेल तर ती आपली दृष्टि. मी लाल रंगाचा चष्मा लावीन तर सारी सृष्टि मला लाल दिसेल.

रामदासस्वामी रामायण लिहीत आणि तें आपल्या शिष्यांना वाचून दाखवीत. मारुति हि तें गुप्तरूपानें ऐकायला येऊन बसे. समर्थांनीं रामायणांत लिहिलें होतें.

"मारुति अशोकवनांत गेला, तेथें त्यानें पांढरीं फुलें पाहिलीं."

हें ऐकतां च मारुति प्रकट झाला आणि म्हणाला, "मीं पांढरीं फुलें मुळीं च पाहिलीं नाहींत. मीं पाहिलेलीं फुलें लाल होतीं. तुम्हीं चुकीचें लिहिलें आहे तें शुद्ध करा."

समर्थ म्हणाले, "मीं लिहिलें आहे तें बरोबर आहे, तूं पांढरीं च फुलें पाहिलीस."

मारुति म्हणाला, "मी स्वतः तेथें गेलों होतों. मी सांगणारा का खोटा?"

शेंवटीं तक्रार रामरायाकडे गेली. रामचंद्र म्हणाले "फुलें पांढरीं च होतीं, परंतु मारुतीचे डोळे त्या वेळेस रागानें लाल झालेले होते म्हणून तीं शुभ्र फुलें त्याला लाल दिसलीं."

---

## देवापाशीं मागणें चांगलें : ११ :

आईनें मुलाला शाबासकी दिली कीं, त्याला आईचें आणखी काम करावेंसें वाटतें. सकाम भक्तीचें असें च आहे. सकाम भक्त सरळ देवाकडे जाऊन मागेल. देवाजवळ जाऊन सारें मागणें ही असामान्य गोष्ट आहे.

ज्ञानदेवांनीं नामदेवाला विचारलें "यात्रेला येतोस काय ?"

नामदेवानें विचारलें "यात्रा कशाला ?"

ज्ञानदेव म्हणाले "साधुसंतांच्या भेटीगाठी होतील."

नामदेव म्हणाला "देवाला विचारून येतो."

नामदेव देवळांत जाऊन देवासमोर उभा राहिला. त्याच्या डोळ्यांतून अश्रु गळूं लागले. देवाच्या त्या सम चरणांकडे तो पाहत राहिला. शेंवटीं रडत रडत त्यानें विचारलें "देवा जाऊं का मी ?"

या नामदेवाला का वेडा म्हणायचें ? देवाजवळ रडणारा भक्त सकाम असला तरी थोर आहे. मनुष्य कोणाजवळ मागतो हें महत्त्वाचें आहे.

---

## मरणाचें स्मरण : १२ :

ज्याला नित्य मरणाचें स्मरण असतें त्याच्या हातून पाप होणें च कठिण. हातांत असलेल्या आयुष्याचा सदुपयोग करण्याची त्याला घाई होते.

एकनाथांची एक गोष्ट आहे.

एका गृहस्थानें नाथांस विचारलें "महाराज, आपलें जीवन किती साधें! किती निष्पाप! आमचें असें कां होत नाहीं? तुम्ही कधीं रागावत नाहीं, कधीं कोणाशीं भांडण नाहीं, तंटा नाहीं. किती शांत, पवित्र, प्रेमळ तुम्ही!"

नाथ म्हणाले, "माझी गोष्ट तूर्त राहूं दे. तुझ्याविषयीं मला एक गोष्ट कळली आहे. तुझें आजपासून सात दिवसांनीं मरण आहे."

नाथांनीं सांगितलेली गोष्ट खोटी कोण मानणार? सात दिवसांनीं मरण! फक्त १६८ तास उरले, अरेरे! तो मनुष्य घाईनें घरीं गेला. त्याला कांहीं सुचेना. निरवानिरवीच्या गोष्टी बोलत होता. आजारी झाला, अंथरुणावर पडला. सहा दिवस होऊन गेले, सातव्या दिवशीं नाथ त्याच्याजवळ आले. त्या गृहस्थानें नमस्कार केला.

नाथांनीं विचारलें "कसें काय आहे?"

तो म्हणाला "जातों आतां."

नाथांनीं विचारलें, "गेल्या सहा दिवसांत किती पाप झालें? पापाचे किती विचार मनांत आले?"

तो आसन्नमरण गृहस्थ म्हणाला, "नाथ, पापाचा विचार करायला फुरसत च झाली नाहीं. सारखें डोळ्यांसमोर मरण होतें."

नाथ म्हणाले "आमचें जीवन निष्पाप कां असतें याचें उत्तर तुला आतां मिळालें ना?"

------

## सत्पात्र कसें ओळखायचें ?  : १३ :

भिक्षा मागणारांबद्दल आपण पुष्कळ वेळां म्हणत असतों कीं हे लोक काम न करतां खातात त्यामुळें यांना अन्नदान करणें हें अपात्रीं दान होय. परंतु पात्र कोण आणि अपात्र कोण याचा निर्णय आपण कसा करणार ?

विनोबांनीं लहानपणीं आपल्या आईला असा च प्रश्न विचारला होता.

ते म्हणाले होते "हे धट्टे कट्टे भिकारी, यांना भीक वाढण्यानें व्यसनें आणि आळस मात्र वाढतील."

यावर विनोबांची आई म्हणाली, "जो भिकारी आला तो परमेश्वर च होता असें मान आणि मग पात्रापात्रतेचा विचार कर. परमेश्वर का अपात्र आहे ? कोण पात्र नि कोण अपात्र हें ठरविण्याचा तुला किंवा मला काय अधिकार ? मी त्याला भगवान् समजून वाढतें. त्यामुळें पात्रापात्रतेचा विचार करण्याची मला जरूर वाटत नाहीं."

विनोबा म्हणतात "या उत्तरावर अजून मला उत्तर सुचलें नाहीं. दुसऱ्याला जेवण घालतांना पात्र अपात्र याचा विचार आपण काढतों पण स्वतःच्या घशांत घालतांना आपण स्वतः अधिकारी आहोंत काय, याचा कधीं विचार मनांत येतो का ? ज्याला आपण देतों तो भगवान् च आहे असें कां समजूं नये ?

———

## परमेश्वर-भावनेंतील दिव्य दृष्टि : १४ :

पुष्कळांची समजूत असते कीं परमेश्वराच्या प्राप्तीसाठीं ध्यान, मनन, इत्यादि साधना करण्यासाठीं कर्माच्या जंजाळापासून स्वतःला अलग केलें पाहिजे. परंतु परमेश्वरपूजेची भावना च जर प्रत्येक कर्मांत दाखल झाली तर तें कर्म जंजाळ न राहतां यज्ञरूप होऊन जातें.

एखाद्या गृहलक्ष्मीनें पोतेरें घालून स्वयंपाकघर स्वच्छ केलें आहे, तेथें चूल पेटवून घरांतील सर्व लहान थोर मंडळींना तुष्टि-पुष्टि-दायक व्हावी अशी रसोई ती करीत आहे. माझा स्वयंपाक सेवन करण्यासाठीं प्रत्यक्ष भगवान् येणार आहे ही भावना जर तिची त्या स्वयंपाकांत दाखल झाली तर तो स्वयंपाक किती पवित्र आणि स्वच्छ होईल ! त्या गृहलक्ष्मीच्या मनांत जर अशी थोर भावना असेल तर भागवतांतील ऋषिपत्न्यांच्या च तोलाची ती होईल. अशा कितीक माता सेवा करून उद्धरून गेल्या असतील आणि मी मी म्हणणारे ज्ञानी पंडित कोपऱ्यांत पडून राहिले असतील.

स्नान करतांना पुरुषसूक्त म्हणण्याची आपल्यांत रूढि आहे. या पुरुषसूक्ताचा स्नानाच्या क्रियेशीं काय संबंध ? संबंध पहाल तर दिसेल. ज्याला हजार हात आहेत, हजार डोळे आहेत, अशा त्या विराट पुरुषाचा माझ्या स्नानाशीं काय संबंध ? संबंध असा कीं तूं जो लोटा डोक्यावर ओतीत आहेस त्यांत हजारो बिंदु आहेत. ते बिंदु तुझें मस्तक धूत आहेत, निष्पाप करीत आहेत. तो तुझ्या मस्तकावर ईश्वराचा आशीर्वाद आहे. परमेश्वराच्या सहस्र हातां-

तील सहस्र धारा जणूं तुझ्यावर वर्षत आहेत. बिंदूंच्या रूपानें परमेश्वर च जणूं तुझ्या डोक्यांतील मळ दूर करीत आहे. अशी दिव्य भावना त्या स्नानांत ओता म्हणजे तें स्नान निराळें च होईल.

---

## कृष्णार्पणाचा चमत्कार : १५ :

सत्कर्म च ईश्वराला अर्पण करायचें असतें असें कांहीं लोकांना वाटतें. परंतु सत् असत् सर्व च ईश्वराला अर्पण करायचें म्हटल्यावर जीवनांत कसें परिवर्तन होतें पहा.

एक होती बाई. तिचें ठरलें होतें कीं जें काय होईल तें कृष्णार्पण करायचें. उष्टयाला शेण लावून तो शेणगोळा तिनें बाहेर फेकावा व कृष्णार्पण म्हणावें. लगे च तो शेणगोळा तेथून उठे व मंदिरांतील मूर्तीच्या तोंडावर जाऊन बसे. तो पुजारी मूर्तीला घासून घासून दमला. परंतु करणार काय ? शेंवटीं कळलें कीं हा महिमा त्या बाईचा आहे. ती बाई जिवंत आहे तोंपर्यंत मूर्ति साफ व्हायची नाहीं. एक दिवस बाई आजारी पडली. मरणाचा शेंवटचा क्षण जवळ आला. तिनें मरण हि कृष्णार्पण केलें. त्या क्षणीं देवळांत मूर्तीचे तुकडे झाले. मूर्ति भंगून पडली. वरून विमान आलें बाईला नेण्यासाठीं. तिनें विमान हि कृष्णार्पण केलें. विमान झाड्कन् मंदिरावर जाऊन आपटलें व त्याचे तुकडे झाले. स्वर्ग हि श्रीकृष्णाच्या ध्यानापुढें कुचकामाच्या आहे.

ही गोष्ट गमतीची आहे. पण सार मोठें आहे. जें काय बरें वाईट कर्म हातून घडेल तें कृष्णार्पण केल्यानें त्या कर्मांत निराळें च सामर्थ्य उत्पन्न होतें.

---

रात्रीं आठ वाजतां देवळांत आरती चाललेली असावी, गंध सुटला आहे, धूप जळतो आहे, दिवे लावले आहेत, आरती ओवाळली जात आहे, अशा वेळेस खरोखर आपण परमात्मा पाहत आहोंत अशी भावना होते. देव दिवसभर जागला, आतां निजायचा. **"आतां स्वामीं सुखें निद्रा करा गोपाळा"** असें भक्त म्हणूं लागतात. शंका घेणारा विचारतो "देव का कोठें झोंपतो ?" अरे मूर्खा, देव झोंपणार नाहीं, जागणार नाहीं, तर काय दगड झोंपणार आणि जागणार ? देव च जागतो, देव च निजतो, देव च खातो पितो. तुलसीदासजी सकाळच्या वेळीं देवाला उठवीत आहेत **"जागिये रघुनाथ कुंवर"**

आपल्या बंधुभगिनींना, नारीनरांना, रामचंद्रांच्या मूर्ति कल्पून ते म्हणत आहेत "माझ्या रामरायांनो उठा." किती सुंदर विचार ! !

विश्वामित्राच्या आश्रमांत रामचंद्र निजले आहेत आणि विश्वामित्र त्यांना उठवीत आहेत. त्याचें वाल्मीकीनें रामायणांत वर्णन केलें आहे.

**"रामेति मधुरां वाणीं विश्वामित्रोऽभ्यभाषत ।**
**उत्तिष्ठ नरशार्दूल पूर्वा संध्या प्रवर्तते"**

'रामा' अशी मधुर हांक विश्वामित्र मारून म्हणत आहेत कीं "पूर्वदिशेला उषा प्रकट होत आहे, संध्येची वेळ झाली." उठवितांना भूपाळी, श्लोक स्तोत्र म्हणा. उठविण्याची साधी च क्रिया परंतु किती काव्यमय आणि सहृदय व सुंदर प्रकारानें ती करतां येते ! जणूं देवाला च उठवायचें.

---

ही अपार सृष्टि म्हणजे ईश्वराचें पुस्तक आहे. जाड पडदे आले म्हणजे हें पुस्तक आपल्याला बंद झाल्यासारखें वाटतें.

अगदीं पहिल्याप्रथम परमेश्वराची मूर्ति म्हणजे आई आपल्याजवळ आहे. "मातृदेवो भव" असें श्रुति सांगते. जन्मतां च मुलाला आईशिवाय दुसरें कोण दिसणार ? आईची पूजा म्हणजे वत्सलतेनें उभ्या राहिलेल्या परमेश्वराची पूजा. ती माउली म्हणजे नि:सीम सेवेची मूर्ति. ईश्वराला आई या नांवानें च हांक मारायची. आई हें पहिलें ठळक अक्षर. त्यानंतर पिता, गुरु, संत.

मानवांतील सौम्यतम आणि पावन मूर्तींत ईश्वराला आधीं पहावयास शिकावयाचें त्याप्रमाणें च या सृष्टींत हि जीं विशाल आणि मनोहर रूपें आहेत तेथें हि त्याला आधीं पहावयास शिकायचें.

ती उषा ! सूर्योदयाच्या पूर्वीची ती दिव्य प्रभा. त्या उषा देवतेचीं गाणीं गातांना ऋषि नाचूं लागत. "हे उषे, तूं परमेश्वराचा संदेश घेऊन येणारी दिव्य दूतिका आहेस. तूं दंवबिंदूंनीं न्हाली आहेस. तूं अमृतत्वाची पताका आहेस." अशीं भव्य हृदयंगम वर्णनें ऋषींनीं केलीं आहेत. तो वैदिक ऋषि म्हणतो "परमेश्वराचा संदेश घेऊन येणारी जी तूं, त्या तुला पाहून जर परमेश्वराचें रूप मला न पटेल, न समजेल, तर परमेश्वर मला कोण समजावूं शकेल ?"

तो सूर्य पहा ! तो नानाप्रकारचीं चित्रें आकाशांत रंगवीत असतो. चित्रकार महिनेच्या महिने कुंचले मारून सूर्योदयाचीं

चित्रें रंगवितात. सकाळीं उठून जरा पहा ती परमेश्वराची कला. त्या दिव्य कलेला, त्या अनंत सौंदर्याला उपमा तरी देतां येईल काय ? ऋषींनीं सूर्याला 'मित्र' म्हटलें आहे.

ती पावन गंगा ! किती सुंदर व प्रसन्न तो प्रवाह ! तिचा तो भव्य गंभीर प्रवाह व तिच्या पोटांत सांठविलेलें ते आकाशांतील अनंत तारे. शंकराच्या जटाजूटांतून म्हणजे च हिमालयांतून वाहत येणारी ती गंगा, जिच्या तीरावर राज्यें तृणवत् समजून फेकून देऊन राजे तपश्चर्येसाठीं येऊन बसत अशी ती पावन गंगा ! मेल्यावर आपल्या अस्थि गंगेंत पडाव्या असें हिंदु मनुष्याला कां वाटतें ? मरतांना दोन थेंब गंगेचे तोंडांत घालतात. ते दोन थेंब म्हणजे परमेश्वर च मुखांत अवतीर्ण होतो. ती गंगा म्हणजे परमेश्वराची करुणा वाहून राहिली आहे.

तो घोडा ! किती उमदा, प्रामाणिक, स्वामिनिष्ठ ! अरब लोकांचें घोड्यावर मोठें प्रेम. एका अरब सौदागराची गोष्ट प्रसिद्ध च आहे. तो अडचणींत सांपडलेला सौदागर घोडा विकण्यास तयार होतो. हातांत मोहरांची थैली घेऊन तो तबेल्यांत जातो. परंतु घोड्याच्या त्या गंभीर प्रेमळ डोळ्यांकडे त्याची नजर जाते. मग ती मोहरांची थैली तो फेंकतो आणि म्हणतो, "जीव गेला तरी हा घोडा मी विकणार नाहीं." पाठीवर थाप मारतां च प्रेमानें फुरफुरतो. कशी त्याची आयाळ ! त्या सायकलींत काय आहे ? घोड्याचा खरारा करा, तो तुमच्यासाठीं मरेल. तो तुमचा मित्र होईल.

माझा एक मित्र घोड्यावर बसावयास शिकत होता. घोडा त्याला पाडी. तो मजकडे येऊन म्हणाला "घोडा पाठीवर

बसूं च देत नाहीं." मीं त्याला म्हटलें "तुम्ही घोड्यावर फक्त बसायला जातां. परंतु त्याची सेवा करतां काय? सेवा दुसऱ्यानें करायची आणि पाठीवर तुम्हीं बसायचें हें कसें जमेल? तुम्ही त्याला खरारा करा, दाणा पाणी द्या, आणि मग बसा. तो मित्र तसें करूं लागला आणि घोडा त्याला पाडीनासा झाला. घोडा परमेश्वर आहे. तो का भक्ताला पाडील? भगवान् श्रीकृष्ण स्वतः घोड्याला खरारा करायचे आणि पीतांबरांतून चंदी चारायचे. असा तो सुंदर प्रेमळ घोडा म्हणजे परमेश्वराची च मूर्ति.

आणि तो सिंह? मी बडोद्यास असतांना पहांटे त्याच्या गर्जनेचा गंभीर ध्वनि कानीं यायचा. देवळाच्या गाभाऱ्यांत जसा आवाज घुमतो तसा तो हृदय-गाभाऱ्यांतील खोल आवाज असे. सिंहाची ती धीरोदात्त दिलदार मुद्रा! त्याची ती बादशाही ऐट, तें बादशाही वैभव, ती भव्य आयाळ. जणूं चवऱ्या च त्या वनराजावर ढाळल्या जात आहेत. सिंह म्हणजे परमेश्वराची पावन मूर्ति! शंकराच्या जवळ सिंह सदैव असतो. ती भगवंताची दिव्य विभूति आहे.

तसा च तो साप. सापाला लोक फार भितात. परंतु साप म्हणजे कडकडीत सोंवळा ब्राह्मण. किती स्वच्छ सुंदर! यत्किंचित् घाण त्याला खपत नाहीं. एकांतांत राहणारा जणूं ऋषि च. निर्मळ, सतेज, मनोहर हारासारखा तो साप. त्याला काय भ्यायचें? आपल्या पूर्वजांनीं तर त्याची पूजा करायला सांगितलें आहे.

लहानपणीं मी आईला गंधाचा नाग काढून द्यायचा. मी आईला म्हणे "बाजारांत नागाचीं चांगलीं चित्रें मिळतात."

ग्रं. क्र. ११४००

आई म्हणे, "तें रद्दी. तें नको. मुलाच्या हातचें तें चांगलें."
ही नाग-पूजा म्हणजे काय आहे ? श्रावण महिन्यांत साप अतिथि म्हणून आपल्या घरीं येत असतो. त्याचें बिचाऱ्याचें घर पावसाळी पाण्यानें भरून गेलेलें असतें. दूर एकांतांत राहणारा तो ऋषि तुम्हांला त्रास नको म्हणून वळचणीला लाकडांत पडून राहतो. कमींत कमी जागा व्यापून बसतो. परंतु आपण दंडा घेऊन धावतों. संकटांत सांपडून आपल्या आश्रयाला आलेल्या अतिथीला का मारायचें ? सेंट फ्रान्सिसची गोष्ट सांगतात कीं जंगलांत साप दिसला तर तो प्रेमानें म्हणायचा "ये भाऊ ये" साप त्याच्या मांडीवर, अंगावर खेळत. हें खोटें नका समजूं. प्रेमामधें ही शक्ति आहे. साप शेतीची रक्षा करतो. शेतीचा नाश करणारे असंख्य किडे व जंतु यांवर तो जगतो. असा हा उपकारी, शुद्ध, तेजस्वी, एकांतप्रिय सर्प म्हणजे भगवंताचें रूप आहे.

आणि तो मोर ! आकाशांत अभ्रें आलेलीं असावींत. पाऊस पडण्याची तयारी असावी, आकाशांत काळा गर्द रंग चढलेला असावा. आणि मग तो मोर आवाज काढतो. हृदय पिळवटून निघालेला तो टाहो ऐका म्हणजे समजेल. आमचें सारें संगीत-शास्त्र मोराच्या या ध्वनीवर उभारलें आहे. मोराचा आवाज म्हणजे षड्ज. हा पहिला षड्ज मोरानें दिला. त्याची ती मेघा-कडे असलेली दृष्टि, त्याचा तो खोल आवाज, मेघांचा धिमि धिमि गड गड आवाज होऊं लागतां च त्याचा उभारला जाणारा तो पिसारा ! अहा हा ! ! त्या पिसाऱ्यासमोर माणसाची सारी ऐट झक मारते ! ! ! केवढा तो भव्य पिसारा, ते सहस्र डोळे, ते नाना रंग, त्या अनंत छटा, ती अद्भुत मृदु, रमणीय वेलबुट्टी.

पहा, पहा तो पिसारा आणि तेथें परमात्मा हि पहा. सर्वत्र परमात्मा दर्शन देत उभा आहे. परंतु आपण न पाहणारे अभागी!

आणि ती कोकिळा मी कशी विसरूं? कोणाला ती हांक मारते? उन्हाळ्यांत नदीनाले आटले परंतु वृक्षांना पल्लव फुटले. कोणी हें वैभव दिलें? कोठें आहे तो वैभवदाता, असें का ती विचारते? कसा उत्कट मधुर आवाज! हिंदु धर्मांत कोकिळेचें व्रत च घालून दिलें आहे. कोकिळेचा आवाज ऐकल्याशिवाय जेवायचें नाहीं असें बायका व्रत घेतात. कोकिळेच्या रूपानें प्रकट झालेला परमात्मा पाहण्यास शिकविणारें हें व्रत. ती कोकिळा किती सुंदर ध्वनि काढते! जणूं उपनिषद च गाते! तिचा ध्वनि कानावर येतो परंतु ती दिसत नाहीं. जी कोकिळा परम आनंदाचा मधुर ध्वनि ऐकविते तिच्या रूपानें सुंदर परमात्मा च प्रकट झाला आहे.

ही कोकिळा सुंदर आणि तो कावळा का रद्दी? कावळ्याचें हि कौतुक करा. मला तो फार आवडतो. त्याचा तो काळा कुळकुळीत रंग, तो तीव्र आवाज, पंख फडफडवीत तो येतो तेव्हां किती छान दिसतो! लहान मुलांचें चित्त वेधून घेतो. लहान मुलें बंद घरांत जेवीत नाहींत. मग त्यांना अंगणांत नेऊन काऊ चिऊ दाखवीत भरवावें लागतें. कावळ्याच्या रूपानें प्रकट झालेल्या परमेश्वराशीं तें मूल पटकन् एकरूप होतें. सृष्टीबद्दल मुलाला जें हें कौतुक वाटतें त्यावर सारी इसापनीति उभारलेली आहे. इसापाला सर्वत्र ईश्वर दिसत होता. रामायण हि या च तत्त्वावर, या च दृष्टीवर उभारलेलें आहे. तुलसीदासांनीं रामाचें बालपण वर्णिलें आहे. राम अंगणांत खेळत आहे, जवळ च कावळा आहे. राम हळूं च त्याला पकडूं पाहतो, कावळा दूर जातो. शेंवटीं

राम थकतो. परंतु त्याला एक युक्ति सुचते. हातांत बर्फीचा तुकडा घेऊन राम कावळयाच्या जवळ जातो. राम तुकडा पुढें करतो कावळा-जरा जवळ येतो. असें हें वर्णन करण्यांत तुलसीदास ओळीच्या ओळी भरून राहिले आहेत. कारण तो कावळा म्हणजे परमेश्वर च आहे.

स्थूल व सूक्ष्म, सरळ व मिसळ, सोपीं अक्षरें आणि जोडाक्षरें, सारें शिका. आणि शेंवटीं परमेश्वराशिवाय एक हि स्थळ नाहीं हें अनुभवा.

---

## लक्ष्मणाची सगुण भक्ति : १८ :

राम वनांत जावयास निघाले त्यावेळीं लक्ष्मणास ते बरोबर नेण्यास तयार नव्हते. ते लक्ष्मणास म्हणाले.

"लक्ष्मणा, मी वनांत जातों, मला पित्याची आज्ञा झाली आहे. तूं घरीं च रहा. माझ्या बरोबर येऊन दुःखी माता-पितरांस आणखी दुःखी करूं नकोस. आईबापांची व प्रजेची सेवा कर. तूं त्यांच्या जवळ असलास म्हणजे मला चिंता वाटणार नाहीं. माझा प्रतिनिधि म्हणून तूं रहा. मी वनांत जातों म्हणजे संकटांत जात नाहीं, ऋषींच्या आश्रमांत जात आहें."

परंतु रामाचा तो सर्व उपदेश लक्ष्मणानें एका तडाख्यासरशीं एका शब्दानें पुसून टाकला. त्याचें तुलसीदासजींनीं मोठें सुंदर चित्र रंगविलें आहे. लक्ष्मण म्हणाला.

"तुम्ही मला उत्कृष्ट निगमनीति सांगत आहांत. ही नीति वास्तविक मीं पाळावी. परंतु मला हें राजनीतीचें ओझें सहन

होणार नाहीं. तुमचा प्रतिनिधि होण्याचें बळ माझ्यांत नाहीं. मी तुमच्या प्रेमावर पोसलेला बालक आहें. हंसपक्षी का मेरुमंदराचा भार उचलील ? तुमची राजनीति तुम्ही दुसऱ्यांना सांगा. मी बच्चा आहें."

मासा ज्याप्रमाणें पाण्यापासून निराळा राहूं शकत नाहीं तसें लक्ष्मणाचें होतें. राम निजले असतां आपण जागरण करावें, त्यांची सेवा करावी, यांत च लक्ष्मणाला आनंद. रामावर होणारा घाव लक्ष्मणानें झेलावा. रामाचा हात च जणूं लक्ष्मण झाला होता. तुलसीदासजी म्हणतात "तो झेंडा वर फडकत असतो, सर्व गाणें त्या झेंडयाचें. परंतु ताठ उभ्या असलेल्या काठीला कोण विचारतो ? तसें रामाच्या यशाची जी पताका फडकत राहिली तिला लक्ष्मण हा दंडाप्रमाणें ताठ आधार होता. रामाचें यश फडकून राहिलें आहे. पण लक्ष्मणाचा पत्ता च नाहीं. जगाला कळस दिसतो पाया दिसत नाहीं, पताका दिसते दंड दिसत नाहीं. नदी समुद्रांत मिळून जावी त्याप्रमाणें लक्ष्मणाची सेवा रामांत मिळून गेली होती. ही लक्ष्मणाची सगुण भक्ति.

------

## भरताची निर्गुण भक्ति : १९ :

राम वनांत गेले तेव्हां भरत घरीं नव्हता. तो अयोध्येंत आला तेव्हां दशरथ राजा मरून गेला होता. वसिष्ठ गुरु त्याला म्हणाले "राज्य कर." भरत म्हणाला "मला रामाला भेटलें पाहिजे." रामाला भेटण्याची उत्कंठा होती तरी राज्याची व्यवस्था तो लावीत होता. हें राज्य रामाचें आहे, त्यामुळें त्याची व्यवस्था लावणें हें रामाचें च काम. सर्व व्यवस्था नीट लावून भरत वनांत

रामाला भेटायला गेला. तो म्हणाला "रामा हें राज्य तुमचें आहे, तुम्ही च..." असें तो म्हणतो आहे तेवढ्यांत राम म्हणाले "भरता, तूं च राज्य चालव." भरत संकोचानें उभा राहतो व म्हणतो "तुमची आज्ञा मला प्रमाण आहे." राम सांगेल तें प्रमाण.

तो राज्य करूं लागला, परंतु मौज पहा. अयोध्येपासून दोन मैलांवर तो तपस्या करीत राहिला. तपस्वी राहून त्यानें राज्य चालविलें. शेंवटीं राम जेव्हां भरताला भेटले तेव्हां वनांत गेलेला खरा तपस्वी कोण हें ओळखतां आलें नसतें. एखाद्यानें जर असें चित्र काढलें कीं दोघांचे तोंडवळे सारखे, थोडा वयाचा फरक, तोंडावर तपस्या ती च, एकमेकांस ओळखतां हि येत नाहीं कीं राम कोणता व भरत कोणता, तर तें मोठें पावन चित्र होईल. भरत देहानें जरी रामापासून दूर होता. तरी मनानें तो रामाजवळ होता. रामाचें काम करून रामाचा वियोग भरतानें जिरवून टाकला होता. ही भरताची निर्गुण भक्ति. परंतु भरत रामाकडून परत माघारा वळला आणि रामाला म्हणाला "रामा समाधान वाटत नाहीं, कांहीं तरी हुरहुर वाटते." रामानें तें ओळखलें आणि म्हटलें "या पादुका ने" अशा रीतीनें सगुणाबद्दलचा आदर शेंवटीं राहिला च. निर्गुणाला सगुणानें ओलें केलें च.

------

## उद्धव आणि अर्जुनाची गोष्ट : २० :

रामाच्या भक्तीचे दोन प्रकार लक्ष्मण आणि भरत यांच्या उदाहरणांत जसे दिसले तसे च उद्धव आणि अर्जुन यांचे कृष्णाच्या भक्तीचे प्रकार म्हणतां येतील.

जेथें कृष्ण तेथें उद्धव असायचा च. उद्धवाला कृष्णाचा वियोग क्षणभर हि सहन व्हायचा नाहीं. कृष्णाजवळ त्यानें सतत सेवा करीत रहावें.

अर्जुन हि कृष्णाचा सखा. अर्जुन कृष्णाचें काम करणारा होता परंतु कृष्ण द्वारकेंत तर हा हस्तिनापूरला.

भगवंतांना जेव्हां देह सोडायची जरूर वाटली तेव्हां त्यांनीं उद्धवाला सांगितलें "उद्धवा, मी जाणार आहें." उद्धव म्हणाला "मला बरोबर कां नाहीं नेत? आपण एकत्र च जाऊं." कृष्ण म्हणाले "हें मला पसंत नाहीं. सूर्य आपलें तेज अग्नीच्या ठिकाणीं ठेवून जातो त्याप्रमाणें माझी ज्योत तुझ्या ठिकाणीं ठेवून मी जाणार आहें." अशी भगवंतांनीं निरवानिरव केली आणि उद्धवाला ज्ञान देऊन रवाना केलें. पुढें उद्धवाला प्रवासांत मैत्रेय ऋषींकडून कळालें कीं भगवान् निजधामाला गेले. परंतु त्याच्या मनावर यत्किंचित् हि परिणाम झाला नाहीं. "**मरका गुरु नि रडका चेला, दोहींचा बोध वायां गेला**" असें त्याचें नव्हतें. जन्मभर तो सगुण उपासना करीत राहिला. पण आतां त्याला निर्गुणांत आनंद वाटूं लागला.

याच्या उलट अर्जुनाचें. कृष्णानें त्याला काय करायला सांगितलें होतें? आपल्या मागें सर्व स्त्रियांच्या संरक्षणाचें काम त्यानें अर्जुनावर सोंपविलें होतें. अर्जुन दिल्लीहून आला व द्वारकेहून श्रीकृष्णाच्या स्त्रिया घेऊन चालला. वाटेंत हिसारच्या जवळ पंजाबमधील चोरांनीं त्याला लुटलें. त्या काळांत अर्जुन हा एकटा च नर-उत्कृष्ट वीर-म्हणून प्रसिद्ध होता. ज्याला पराजय माहीत च नाहीं, म्हणून 'जय' हें नांव मिळालें, प्रत्यक्ष शंकरा-

बरोबर ज्यानें झुंज घेतली आणि त्याला नमविलें तो अर्जुन अजमीरजवळ पळतां पळतां वांचला. कृष्ण निघून गेला याचा त्याच्या मनावर फार परिणाम झाला. जणूं त्याच्यांतील जीव च निघून गेला व त्याचें निस्त्राण निष्प्राण शरीर च उरलें. कृष्णापासून दूर राहणारा निर्गुण उपासक अर्जुन, पण त्याला शेंवटीं वियोग फार जाणवला. निर्गुणाला सगुणाचा अनुभव आला.

अशा रीतीनें सगुण निर्गुण एकमेकांना पूरक आहेत.

---

## 'मी' म्हणजे देह नव्हे : २१ :

हल्लीं कुशिक्षणानें फार वाईट संस्कार होऊन राहिले आहेत. सर्व देहाचे च चोचले चालले आहेत. देहाचे देव्हारे मांडावयाचा अभ्यास रात्रंदिवस शिकविला जात आहे.

अगदीं लहानपणापासून या देह-देवाची पूजा करण्याचें शिक्षण देण्यास आरंभ होतो. जरा कुठें पायाला ठेंच लागली तर माती टाकल्यानें भागतें. किंवा माती टाकायची हि मुलाला गरज भासत नाहीं. जरा खरचटलें तर त्याची तें चिंता हि करणार नाहीं. परंतु त्या मुलाच्या पालकाचें चालत नाहीं. तो मुलाला जवळ घेईल "किती रे लागलें ! रक्त निघालें वाटतें !" असें म्हणून मुलगा रडत नसला तर त्याला रडायला लावील. मुलाला शिकवितात "उडचा मारूं नकोस, लागेल, खरचटेल" फक्त देहाकडे च पाहण्याचें शिक्षण.

बाळाचें कौतुक जसें देहाच्या बाजूनें तसें त्याची निंदा हि देहाच्या च बाजूनें. म्हणतात "काय रे शेंबडा आहेस !" हा त्या

मुलावर केवढा मिथ्या आरोप ! मुलाच्या नाकांत शेंबूड असेल ही गोष्ट खरी, व तो पुसला पाहिजे हें हि खरें. परंतु तो मुलगा म्हणजे सुंदर, स्वच्छ, पवित्र, निर्मळ परमात्म्याचें स्वरूप. तो का शेंबडा ? शेंबडाचा आणि त्या मुलाचा काय संबंध ?

शाळेंत मुलगा गणित चुकला तर तोंडांत मारतात. या मारण्यानें मुलाची पशुवृत्ति आपण वाढवितों. 'तूं देह आहेस' हें त्याच्या मनावर ठसवितों. अशी देहासक्ति वाढवून कधीं हि सुधारणा व्हायची नाहीं.

देहांत किंवा मनांत असलेल्या दोषांची जाणीव असणें वाईट नाहीं. परंतु 'मी' म्हणजे देह नाहीं हें स्पष्ट कळलें पाहिजे. स्वतःचे दोष सुधारण्यासाठीं स्वतःला देहापासून अलग करून जो आत्मपरीक्षण करील तो च ते दोष दूर करूं शकतो. माझ्या चरख्यांतील दोष कोणीं दाखविला, तर मला राग येतो का ? नाहीं. कारण मी चरख्याहून वेगळा आहे हें आपण जाणतों. म्हणून कोणीं चरख्यांतील दोष दाखविला तर आपण दूर करतो. परमेश्वराच्या घरची शेती करण्याचें देह हें औजार आहे, असें ओळखून त्या औजारांतील दोष दूर केले पाहिजेत.

खेळाच्या बाहेर असलेल्या माणसाला जसे खेळांतील गुण-दोष चांगले कळतात तसें देह-मन-बुद्धि यांपासून जो स्वतःला अलग राखतो तो त्यांच्यांतील गुणदोष लवकर ओळखतो. कांहीं लोक म्हणतात "हल्लीं माझें स्मरण जरा कमी झालें आहे" म्हणजे स्मरणशक्तीहून 'मी' निराळा आहे हें स्पष्ट झालें. एखाद्याचें औजार बिघडावें तशी त्याची स्मरणशक्ति बिघडली असा त्याचा अर्थ.

देहाहून मी अलग आहें ही गोष्ट जोंपर्यंत लक्षांत येणार नाहीं तोंपर्यंत जुलमी लोक आमच्यावर जुलूम करतील, आम्हांला बंदे गुलाम करतील.

एक होता राक्षस. त्यानें एका माणसाला पकडलें होतें. तो एकसारखा त्याच्याकडून काम करून घेई. काम न केलें तर "खाऊन टाकीन" असें म्हणावयाचा. प्रथम प्रथम तो मनुष्य भीत असे. परंतु पुढें जेव्हां फार होऊं लागलें तेव्हां तो माणूस म्हणाला "खाणार तर खाऊन टाक" परंतु तो राक्षस का त्या माणसाला खाऊन टाकणार होता ? त्याला तर बंदा नोकर पाहिजे होता. परंतु 'खाऊन टाक' असें उत्तर मिळतां च जुलूम थांबला. जुलूम करणारांना माहीत असतें कीं हे लोक देहाला कवटाळणारे आहेत. यांच्या देहाला कष्ट दिले कीं हे लोक गुलाम होतील. परंतु देहाची आसक्ति तुम्ही सोडा कीं लगेच तुम्ही सम्राट व्हाल, स्वतंत्र व्हाल.

रिड्ले आणि लॅटिमर हे महान् धर्मप्रचारक होऊन गेले. ते म्हणत "आम्हांला जाळतां ? आम्हांला कोण जाळणार ? आम्ही तर धर्माची अशी ज्योत पेटवून राहिलों आहोंत कीं जी कधीं विझणार नाहीं. ही देहाची मेणबत्ती पेटवून सत् तत्त्वांची ज्योत पेटत ठेवणें हें आमचें काम."

सॉक्रेटिसाला विष देऊन मारावें अशी शिक्षा देण्यांत आली. तेव्हां तो म्हणाला "मी आतां वृद्ध झालों आहे. चार दिवसांनीं देह मरणार च होता. जो मरणार होता त्याला मारून तुम्हीं काय पुरुषार्थ साधलात तें तुम्हांस च माहीत !!" ज्या दिवशीं सॉक्रेटिस विष पिऊन मरायचा होता त्याच्या आदल्या रात्रीं तो आत्म्याच्या अमरत्वाविषयीं शिष्यांना सांगून राहिला होता. शरीरांत विष

भिनल्यावर कशा वेदना होतील हें तो मौजेनें सांगत होता. आत्म्याच्या अमरत्वाविषयीं चर्चा संपल्यानंतर त्याच्या एका शिष्यानें विचारलें, "तुम्ही मेल्यावर तुम्हांला कसें पुरायचें?" तेव्हां सॉक्रेटिस म्हणाला "अहा रे शाहण्या, ते मला मारणार व तूं मला पुरणार होय? तो मारणारा माझा दुष्मन आणि तूं पुरणारा माझ्यावर मोठा प्रेम करणारा वाटतें! तो शहाणपणानें मला मारणार तूं शहाणपणानें पुरणार! तूं रे कोण मला पुरणार? मी तुम्हा सर्वांस पुरून उरणार आहें. कशांत मला पुरणार? मातींत कीं तपकिरींत? मला कोणी मारूं शकत नाहीं नि कोणी पुरूं शकत नाहीं," आणि खरोखर च आज दोन अडीच हजार वर्षें तो महान् सॉक्रेटिस सर्वांना पुरून उरला आहे.

---

## नित्य-नवीनतेची गोडी : २२ :

सृष्टि नित्य बदलणारी, म्हणजे क्षर आहे, हें तिचें दूषण नसून भूषण आहे. त्यामुळें सृष्टींत नित्य नवीनता येते. चंद्राची कला आजची उद्यां नाहीं. चंद्राचें रोज निराळें लावण्य. द्वितीयेचा तो वर्धमान् चंद्र पहिला म्हणजे केवढा आनंद होतो! शंकराच्या भालप्रदेशावर ती द्वितीयेची चंद्रशोभा प्रकट झाली आहे. अष्टमीच्या चंद्राचें सौंदर्य विशेष असतें. अष्टमीस आकाशांत वेंचक मोत्यें च दिसतात. पौर्णिमेला चंद्राच्या तेजानें तारका दिसत च नाहींत. पौर्णिमेला परमेश्वराचा मुखचंद्र दिसतो. अमावस्येचा आनंद तर फार गंभीर असतो. अमावस्येच्या रात्रीं केवढी निःस्तब्ध शांतता असते. चंद्राचा जुलमी प्रकाश नसल्यामुळें लहान मोठे अगणित तारे पूर्ण स्वातंत्र्यानें चमचम करीत असातात. अमावास्येला

स्वातंत्र्याचा पूर्ण विलास असतो. आपल्या तेजानें दिमाख दाखविणारा चद्र आज येथें नसतो. स्वतःला प्रकाश देणाऱ्या सूर्याशीं त्या दिवशीं तो एकरूप झालेला असतो, परमेश्वरांत मिळून गेलेला असतो. जीवानें स्वात्मार्पण करून आपणापासून जगाला यत्किंचित् हि त्रास पोंचवूं नये असें जणूं तो त्या दिवशीं दाखवीत असतो. चंद्राचें स्वरूप बदलतें आहे. परंतु तें निरनिराळा आनंद देते.

---

## पुरुषोत्तमाचें सर्वत्र दर्शन : २३ :

आपण पूजाद्रव्यानें परमेश्वराची पूजा करतों. परंतु पूजा करणारा मी हा सेवापुरुष, तो पुरुषोत्तम हा सेव्य पुरुष, आणि ही नानारूप-धारिणी वाहती सृष्टि हि पुरुष च.

ही दृष्टि कशी येईल? सर्वत्र अव्यंग निर्मळ प्रेमभाव ठेवायचा. तुझ्या पायांतील चप्पल करकर वाजत आहे. थोडें तेल दे तिला. तेथें परमात्म्याचा अंश आहे. ती चप्पल नीट राख. तो सेवा-साधन चरखा. तो ओरडतो आहे 'नेति नेति,—सूत कांतणार नाहीं'—त्याला तेल घाल. त्याची माळ म्हणजे त्या साधनरूपी पुरुषाचें जानवें तें नीट ठेव. ओंकाराचें सुंदर गाणें गाणारा तो चरखा. तो का जड आहे? परमात्म्याची च ती मूर्ति.

पोळ्याच्या दिवशीं अहंकार सोडून बैलाची आपण पूजा करतों. फार थोर गोष्ट आहे ही. पोळ्याची कल्पना रोज मनांत राखून बैलाला चांगलें ठेव. त्याच्यापासून नीट काम घे. पोळ्याच्या दिवशींची भक्ति त्या च दिवशीं संपली असें न होवो. बैल म्हणजे परमात्म्याची मूर्ति.

शेतीचीं अवजारें, तीं साधनें, नीट ठेव. फक्त गुलाल गंध अक्षता फुलें वाहणें म्हणजे पूजा नव्हे. भांडीं आरशासारखीं ठेवणें ही भांडयांची पूजा. दिवा स्वच्छ पुसायचा ही त्याची पूजा. विळयाला धार लावून शेतीच्या कामासाठीं तयार ठेवायचा ही त्याची पूजा. दाराचें बिजागर गंजून गेलें. त्याला तेल घालून संतुष्ट करणें ही त्याची पूजा. सेवा-द्रव्यें उत्कृष्ट व निर्मळ राखायचीं. सर्वत्र एक च चैतन्य खेळून राहिलें आहे ही दृष्टि आली म्हणजे कर्मांत ज्ञान आलें.

---

## दोषांतून सुटण्याची युक्ति : २४ :

कोणतें हि कर्म म्हटलें तरी त्यांत कांहीं ना कांहीं दोष असतो च. मग सर्व च कर्में कां सोडून देऊं नयेत ? असें म्हटलें जातें. परंतु गंमत अशी आहे कीं '**इंद्राय स्वाहा तक्षकाय स्वाहा**' असें जेव्हां मनुष्य जगांत करूं लागतो तेव्हां इंद्र अमर असल्यामुळें तो तर मरत च नाहीं, परंतु तक्षक देखील न मरतां मजबूत होऊन बसतो. सात्त्विक कर्मांत पुण्याबरोबर थोडा दोष हि आहे. परंतु दोष टाळण्यासाठीं त्या पुण्याची हि आहुति देऊं पहाल तर पुण्य चिकट असल्यामुळें मरणार नाहीं, परंतु दोषक्रिया मात्र वाढतील.

एक होता मनुष्य. त्याला आपलें घर अमंगळ वाटलें. म्हणून तें सोडून एका खेडयांत गेला. त्या खेडयांत हि त्याला घाण दिसली. म्हणून तो जंगलांत गेला. तेथें एका आंब्याच्या झाडाखालीं तो बसला. वरून एका पक्ष्यानें त्याच्या डोक्यावर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रमांक 22.1.26 वि: ...
क्रमांक 9209 नों: दि: ...

घाण केली. हें जंगल हि अमंगळ असें वाटून तो नदींत जाऊन उभा राहिला. नदींत मोठे मासे लहान माशांना खात असलेले पाहून त्याला शिसारी आली. सारी सृष्टि च अमंगळ आहे, येथें मेल्याशिवाय गत्यंतर नाहीं, असें मनांत ठरवून तो मनुष्य बाहेर आला आणि त्यानें होळी पेटविली. तिकडून एक गृहस्थ आले आणि म्हणाले "कां जीव देतोस?" तो म्हणाला "हें जग अमंगळ म्हणून." तो गृहस्थ म्हणाला "तुझें हें शरीर का कमी अमंगळ आहे? ही चरबी जळूं लागली म्हणजे किती घाण सुटेल? एक केस जळला तर कोण घाण सुटते!" तो मनुष्य वैतागून म्हणाला "या जगांत मरण्याची हि सोय उरली नाहीं."

अमंगळ अमंगळ म्हणून सारें च टाळाल तर जमणार नाहीं. मनावरचा लेप कमी होऊन चित्तशुद्धि होत गेली पाहिजे. म्हणजे मग पुढें कर्मत्याग न होतां कर्म गळून पडेल.

एखाद्या ठिकाणीं फार गोंगाट चालला आहे असें समजा. एखादा शिपाई येतो आणि तो गोंगाट बंद करण्यासाठीं स्वतः जोरजोरानें ओरडतो. तेथला गोंगाट बंद करण्यासाठीं मोठ्यानें बोलण्याची तीव्र क्रिया त्याला करावी लागते. दुसरा एखादा येईल आणि नुसतें बोट वर करील. तेवढ्यानें लोक शांत होतील. तिसरा एखादा नुसता हजर झाला कीं सारे शांत बसतील. पहिल्याची तीव्र क्रिया, दुसऱ्याची सौम्य क्रिया आणि तिसऱ्याची सूक्ष्म क्रिया. परंतु लोकांना शांत करण्याचें काम समान च झालें. जसजशी चित्तशुद्धि होत जाईल तसतशी क्रियेची तीव्रता कमी होईल.

------

## त्याग आणि दान यांतील फरक : २५ :

एका माणसानें भलेपणानें व्यवहार करून पैसा मिळविला आहे. त्यावर तो आपला प्रपंच सुखानें चालवीत आहे. बायको-मुलांवर त्याची माया आहे. देहाविषयीं ममता आहे. साहजिकपणें च पैशावर त्याचा भर आहे. दिवाळीचे दिवस आले म्हणजे आपल्या जमाखर्चाचा तो काळजीनें आढावा काढतो. एकंदरींत खर्च जमेच्या आटोक्यांत राहिला आहे आणि त्यामुळें 'पुंजी' कांहींशी वाढत आहे असें पाहून तो राजी होतो. मोठ्या थाटानें पण तितक्या च भक्तिभावानें तो लक्ष्मीची पूजा करतो. त्याला द्रव्याविषयीं लोभ असला तरी त्याबरोबर च लौकिकाची म्हणा, परोपकाराची म्हणा, बरी च चाड आहे. देवा-धर्मासाठीं—ह्यांत च देशासाठीं हि समजा—खर्च केलेल्या पैशाची फेड सव्याज होते, असा त्याचा विश्वास आहे. त्यामुळें त्याकामीं तो सढळ हातानें खर्च करीत असतो. आणि लहान मुलांना जसा आईचा तसा आसपासच्या गरीब–गुरीबांना त्याचा मोठा आधार वाटत आहे.

दुसऱ्या एका माणसानें असा च सचोटीनें पैसा मिळविला होता पण त्यांत त्याचें समाधान नव्हतें. त्यानें एकदां बगीच्यासाठीं विहीर खणवून घेतली. विहीर फार खोल झाली. तिच्यांतून थोडी माती, कांहीं मुरूम आणि पुष्कळ दगड निघाले. त्यांचा ढीग हि तसा च उंच झाला होता. तो आपल्या मनाशीं विचार करूं लागला, "माझ्या तिजोरींत हि पैशाची अशी च एक टेंकडी झाली आहे. त्या मानानें दुसरीकडे कुठें एखादा खळगा तर झाला नसेल?" विचाराचा धक्का विजेसारखा असतो. एवढ्या विचारानें तो खडबडून जागा झाला. ती विहीर त्याचा गुरु बनली. त्या विहिरी-

कडून त्याला जो मंत्र मिळाला त्याच्या कसोटीवर त्यानें आपली सचोटी घासून पाहिली. पण ती कसाला उतरत नाहीं असें च त्याला दिसलें. 'धंदेवाईक सचोटी' मीं राखली असली तरी असल्या वाळूच्या पायावर माझें घर कितीसें टिकणार? ह्या विचारानें त्यास पुरतें पछाडलें. शेंवटीं दगड माती आणि माणिक मोतीं ह्यांत त्याला कांहीं च फरक दिसेनासा झाला. नुसता केर-कचरा भरून ठेवण्यांत काय हंशील आहे. असा विचार करून तो एका सुंदर पहांटे उठला. सगळी संपत्ति गाढवांवर भरून गंगेवर घेऊन गेला, "आई, माझें पाप धुऊन टाक" इतकें म्हणून त्यानें ती कमाई आईच्या ओटींत रिकामी केली आणि बिचारा स्नान करून मोकळा झाला. त्याला कोणी विचारतात, "दान तरी कां केलें नाहींस?" तो असें उत्तर देतो. "दान करावयाचें म्हणजे 'पात्र' पहावें लागतें. अपात्रीं दान करण्यानें धर्म करतां अधर्म होऊन बसण्याची धास्ती असते. मला आयतें च गंगेचें 'पात्र' मिळालें. तेथें मीं दान केलें." ह्याहून थोडक्यांत तो इतकें च म्हणतो, "केर-कचऱ्याचें का दान करावयाचें आहे?" त्याचें शेंवटचें उत्तर म्हणजे "मौन." अशा रीतीनें त्यानें संपत्तीचा त्याग केल्यामुळें आज सगळ्या 'जिवलगांनीं' त्याचा त्याग केला आहे.

पहिला दाखला दानाचा आहे. दुसरा त्यागाचा आहे.

'मधुकर' मधून

---

## माणूस आणि घोडा : २६ :

पूर्वी माणूस आणि घोडा अलग राहत असत. कोणी कोणाच्या ताब्यांत नव्हता. एकदां माणसाला कांहीं तांतडीचें काम

पडलें. तेव्हां त्यानें घोड्यापाशीं त्याची पाठ थोड्या वेळापुरती भाड्यानें मागितली, घोड्यानें हि शेजारधर्म आठवून माणसाच्या म्हणण्याला कबुली दिली. माणूस म्हणाला, "मला तुझ्या पाठीवर तसें च बसतां येणार नाहीं. लगाम घालूं देशील तर च तुझी पाठ मला वापरतां येईल." त्यानें हें हि म्हणणें कबूल केलें. माणसानें लगाम घालून घोड्यावर स्वारी केली. घोड्यानें हि थोड्या वेळांत कामगिरी बजावून दिली. आतां कराराप्रमाणें घोड्याची पाठ मोकळी करावयाची. पण माणसाचा लोभ सुटेना. तो म्हणतो "हे बघ गड्या, तुझी पाठ कांहीं मला सोडवत नाहीं. तेव्हां तेवढी गोष्ट तूं मला माफ कर. बाकी तूं माझी चाकरी केली आहेस--आणि ह्यापुढें हि करशील--ही गोष्ट मी--कधीं हि विसरणार नाहीं. त्याबद्दल मी तुझी चाकरी करीन. तुझ्यासाठीं तबेला बांधीन. तुला दाणा देईन. पाणी पाजीन. खरारा करीन. काय म्हणशील तें करीन. पण तेवढी गोष्ट काढूं नको." घोडा बिचारा काय करणार ? मोठ्यानें खिकाळून त्या मुक्या जनावरानें आपली फिर्याद देवाच्या दरबारी रुजूं केली. घोड्याला त्याग पाहिजे होता. माणूस दानाच्या गोष्टी सांगत होता. भल्या माणसा, हा तरी बोल खरा होऊं दे !

---

## राक्षस आणि माणूस : २७ :

एकदां एक राक्षस आणि एक माणूस कांहीं करार करून प्रवासाला निघाले. चार दोन दिवस त्यांचें नीट चाललें. पुढें राक्षस कराराच्या अटी एकामागून एक मोडूं लागला आणि माणसावर एक एक नवीन शर्त लादूं लागला. माणसानें जरा

तक्रार केली कीं, 'खाऊन टाकतों' म्हणायचा. त्यानें कांहीं दिवस सहन करून पाहिलें पण त्यामुळें मंत्राचा जप अधिक च होऊं लागला. शेंवटीं त्यानें जिवाचा धडा केला आणि 'खाऊन टाकतों, खाऊन टाकतों म्हणतोस तर खाऊन टाक' असें एकदाचें राक्षसाला सांगून टाकलें. तेव्हांपासून त्याच्यामागची कटकट थांबली. म्हणतात नां? भित्यापाठीं ब्रह्म-राक्षस!! भीति सोडली कीं राक्षस पळाला च.

---

## कल्पवृक्षाची गोष्ट :२८:

एकदां दुपारच्या उन्हांत चालून थकून गेलेला एक प्रवासी एका झाडाखालीं विसांवा घेण्यासाठीं बसला. थोडा विसांवा घेतल्यानंतर "आतां जर थंडगार पाणी मिळालें तर काय बहार होईल!" असा विचार त्याच्या मनांत आला. त्याबरोबर जमीन दुभंग झाली आणि पाताळांतील पाण्याची गोड धार त्याच्या तोंडांत येऊन पडली. ज्या झाडाखालीं तो बसला होता तें सामान्य झाड नसून तो कल्पवृक्ष होता हें त्याला माहीत नव्हतें, त्यामुळें त्या प्रवाश्याला आश्चर्य वाटलें. थोडचा वेळानें आश्चर्याचें रूपांतर भीतींत झालें—"हें भूत बीत तर नसेल?" झालें. समोर एक अकराळ विकराळ भूत उभे राहिलें. त्या माणसाच्या मनांत आलें "आतां मला हें खाल्ल्याशिवाय राहत नाहीं!" झालें, प्रवास संपला! समाज हि असा च एक कल्पवृक्ष आहे. त्याच्या सावलींत बसून जशी भावना कराल तसें फळ मिळेल.

---

## शंकर, पार्वती आणि नंदी : २९ :

शंकर आणि पार्वती नंदीवर बसून फिरावयास निघाली होती. तें पाहून "बैल झाला तरी त्याला असें ताबडावें काय ?" असा एकानें आक्षेप घेतला. त्याचें समाधान करण्याकरितां पार्वतीमाता खालीं उतरून पायीं चालूं लागल्या. त्यावर "सुकुमार अबलेची दरकार न करणारा हा धटिंगण कोण हो ?" अशी शंकरांना शिवी मिळाली. नंतर मातुश्री नंदीवर बसल्या. शंकर चालूं लागले. "नवरा चालत असतां नंदीवर बसणारी निलाजरी बाई आज च पाहिली." असा आईसाहेबांना टोमणा मिळाला. मग दोघे नंदीबरोबर चालूं लागले. तेव्हां दोघे नंदीबैल ठरले. शेंवटीं नारदांनीं नंदीला डोक्यावर घेण्याची सल्ला दिली. तेव्हां दोघांनीं पूर्वीप्रमाणें सरळ नंदीवर आसन ठेवलें. कारण, मुद्दा त्यांच्या लक्षांत येऊन चुकला. "हातचीं तत्त्वें सोडून पळत्या लोकसंग्रहाच्या पाठीं लागण्यांत कांहीं हंशील नाहीं."

---

## श्रीमंताचा पोर आणि पृथ्वीभर चामडें : ३० :

श्रीमंताचा मुलगा ! कधीं एकदां खेळायला घराबाहेर निघाला होता. इकडे सूर्यनारायणाची आकाशांत शांत तपश्चर्या चालू च होती. बाळचा पडला नाजुक साजुक. पाय पोळूं लागले. त्यामुळें दुनियेचा दोस्त सुद्धां त्याला दुश्मनासारखा दिसला. श्रीमंताचा च पोर तो--डोक्यानें काम करण्यांत मोठा पटाईत होता. त्यानें शक्कल काढली कीं सगळ्या जमिनीवर चामडें आंथरून द्यावें म्हणजे पाय भाजणार नाहींत. लागलीं च घरी येऊन

त्यानें आपली कल्पना बापाला सांगितली. बापाला बाळ्याचें कौतुक तर वाटलें च. पण तें आवरून तो त्याला म्हणाला, "अरे खुळ्या, सगळ्या पृथ्वीला चामडें नेसविण्यापेक्षां तूं च आपल्या पायांत जोडे घाल म्हणजे झालें !"

आमचें असें च आहे. आम्हांला आकाशाला गवसणी घालणाऱ्या मोठ्या मोठ्या 'कल्पना' सुचतात, पण साधे सरळ इलाज सुचत नाहींत.

---

## नारदाची पृथ्वी-प्रदक्षिणा : ३१ :

पृथ्वीची प्रदक्षिणा सर्वांत लवकर कोण करतो, याविषयीं एकदां देवांच्या सभेंत चर्चा निघाली. प्रत्येकानें लांबलचक गणित करून "मी अमुक वेळांत प्रदक्षिणा करून येतों" असें उत्तर काढलें. त्याप्रमाणें सर्वांनीं प्रदक्षिणा करून विष्णूला नमस्कार घालावा असें ठरलें. जो तो धावूं लागला. नारद स्वस्थ होते. त्यांनीं चर्चेंत हि भाग घेतला नाहीं आणि पायपिटींत हि भाग घेतला नाहीं, ब्रह्मवीणेच्या नादांत ते रंगून गेले होते. पण अगदीं पहिला देव धापा टाकीत परत येत आहे असें पाहतां च त्यांनीं स्वत:भोंवतीं गिरकी मारून विष्णूला नमस्कार घातला. सर्व देव परत आल्यावर विष्णूनें परीक्षेचा निकाल लावून नारदांचा पहिला नंबर लावला. विष्णु म्हणाला, "'पिंडीं तें ब्रह्मांडी' ह्या सूत्राप्रमाणें नारदांनीं पृथ्वी-प्रदक्षिणा पुरी केली आहे असें माझें मत आहे."

आम्ही जग सुधारण्याचा ठेका घेऊन बसतों, परंतु जगांत 'आमची' हि गणना होते एवढी मुद्याची गोष्ट लक्षांत येत नाहीं.

---

## दहावा हरवला : ३२ :

दहा माणसें यात्रेला निघालीं होतीं. जंगलांतून पसार व्हावयाचें होतें. वाट जरा धोक्याची असल्यामुळें सगळ्या माणसांनीं एकत्र चालावें असा ठराव झाला. एकानें माणसें मोजून पाहिलीं तों नऊ च भरलीं. दुसऱ्यानें मोजून पाहिलीं तरी नऊ च असें कां ? दहावा माणूस कोठें आहे ? कांहीं पत्ता लागेना. शेंवटीं "दहावा माणूस हरवला" असा दहाजणांनीं एकमतानें ठराव पास केला !

आमचा असा च घोटाळा होत असतो. 'काम करायला माणसें नाहींत.' असें म्हणणारीं 'माणसें' ठिकठिकाणीं आढळतात.

---

## राजाचा यज्ञ आणि दूध : ३३ :

राजाला यज्ञासाठीं पुष्कळ दुधाची जरूरी होती. त्यानें शहराच्या मध्यभागीं एक भलें मोठें भांडें उभें करून हरएकानें एकेक शेर दूध त्यांत ओतावें अशी दवंडी पिटवून दिली. एकानें विचार केला, "इतक्या सगळ्या लोकांचें दूध येणार आहे त्यांत मीं शेरभर पाणी टाकलें म्हणून काय होणार आहे ?" त्यानें शेरभर पाणी टाकलें. दुसऱ्याला हि तो च विचार सुचला. त्यानें हि तसें च केलें. हा च कार्यक्रम सर्वांस पसंत पडून तें भांडें शुद्ध गंगाजलानें तुडुंब भरून गेलें.

म्हणून दुसरे आपला धर्म पाळोत कीं न पाळोंत, तुला तो पाळला च पाहिजे.

---

## टीकाकाराची गोष्ट                                                    : ३४ :

दुनिया पैदा करावी अशी ब्रह्मदेवाला इच्छा झाली. त्याप्रमाणें आतां घडण व्हावयाची. इतक्यांत त्याच्या मनांत काय आलें कोण जाणें. त्याला वाटलें, "आपल्या कामांतील बरें वाईट सांगणारा कोणी तरी असला तर मोठी मौज होईल." त्यामुळें आधीं त्यानें एक चांगला तरबेज टीकाकार बनविला. ह्यामुळें "मी जें काय घडवून आणीन त्याची तपासणी करण्याचें काम तुझें" असा त्या टीकाकारास अखत्यार देण्यांत आला. इतकी तयारी झाल्यावर ब्रह्मदेवानें आपला कारखाना चालू केला. ब्रह्मदेव एक एक चीज बनवत गेला आणि टीकाकार तिच्यांतली चूक दाखवून आपल्या जन्माचें चीज करूं लागला. टीकाकाराच्या चांचणीपुढें बिनचूक म्हणून कांहीं निघेचना. "हत्तीला वर पाहतां येत नाहीं, उंट वर च पाहतो, गाढवांत चपळपणा नाहीं, माकड अचपळ" अशा रीतीनें ही टीकाकाराची टाकसांळ सुरू झाली. तो आपले शेरे मारीत गेला. ब्रह्मदेवाची अक्कल गुंग झाली. तरी त्यानें शेंवटचा प्रयत्न करून पाहण्याचें ठरविलें आणि कारागिरीची कमाल करून 'माणूस' घडवून काढला. टीकाकार निरखून पाहूं लागला. अखेर चूक निघाली च. "ह्याच्या छातींत एक खिडकी पाहिजे होती. म्हणजे ह्याचे विचार सगळ्यांना समजले असते." ब्रह्मदेव म्हणाला, "तुला बनविलें ही च माझी खरी चूक आहे. आतां मी तुला शंकराच्या ताब्यांत देतों."

पण हे टीकाकार शंकराच्या ताब्यांत गेलेले दिसत नाहींत. ब्रह्मदेवानें टीकाकाराला बरें-वाईट पहायला सांगितलें होतें. टीकाकारानें स्वतःचें बरें पाहिलें आणि ब्रह्मदेवाचें वाईट पाहिलें.

———————

## दुर्वर्तनी बाई आणि ख्रिस्त : ३५ :

कोणा बाईच्या हातून कांहीं दुर्वर्तन झालें असेल. त्याची चौकशी करून त्या बाईला योग्य न्याय देण्यासाठीं 'महाजन-मंडळ' बसलें होतें. श्रवणभक्त हि बरे च जमा झाले असतील हें सांगण्याची जरूर च नाहीं. पण त्या बाईच्या सद्भाग्यानें ख्रिस्त-देवांना तेथें खेंचून आणलें होतें हें विशेष. पंचांनीं निकाल फर्मा-विला; "बाईनें घोर अपराध केला आहे. सर्वांनीं दगड मारून तिला शरीरांतून मुक्त करावें." निकाल ऐकतां च माणसांचे हात सरसावले आणि आसपासचे दगड थरथर कांपूं लागले. ख्रिस्त-देवांना त्या दगडांची दया आली. त्यांनीं उभें राहून सर्वांना एक च वाक्य सांगितलें; "ज्याचें मन अगदीं चोख असेल त्यानें पहिला दगड मारावा." मंडळी क्षणभर स्तब्ध राहिली. हळूं हळूं एकेक जण तिथून चालता होऊं लागला. शेंवटीं ती अभागी बाई आणि ख्रिस्तदेव दोघे च उरले. त्यांनीं तिला थोडा बोध करून प्रेमानें निरोप दिला.

विश्वाचे गुणदोष-परीक्षण करूं पाहणारा बहुदा स्वतःस निर्दोष मानून बसलेला असतो.

---

## साधु आणि तलवार : ३६ :

"कोणी एक सत्यवचनी शुद्ध मनाचे साधु-पुरुष एका अर-ण्यांत तपश्चर्या करीत होते. त्यांच्या शांत तपश्चर्येच्या प्रभावानें त्या अरण्यांतील पशु-पक्षी देखील आपआपसांतलें वैर विसरून गेले होते. त्यामुळें त्या सर्व अरण्याला एखाद्या आश्रमाचें रूप आलें होतें. जेथें अरण्यांतल्या सिंहाचें च आसन बदललें तेथें इंद्राचें

अनुक्रम २८९२५ वि. ... क्रमांक ९२८८ नों दि ...

'सिंहासन' डळमळूं लागलें असल्यास नवल नाहीं. त्यानें साधूची तपश्चर्या हाणून पाडण्याचा निश्चय केला. तो हातांत तलवार घेऊन योद्धयाच्या वेषानें त्या साधूजवळ आला आणि विनवूं लागला, 'माझी एवढी तलवार आपण सांभाळून ठेवा.' साधूला काय वाटलें कोणास ठाऊक ? त्यानें ती विनंति मान्य केली. तेव्हां इंद्र तेथून निघून गेला. साधूनें तलवार सांभाळण्याची जबाबदारी स्वीकारली होती. त्यामुळें सदा सर्वदा तो ती तलवार आपल्यापाशीं च राखत असे. देवपूजेसाठीं फुलें वगैरे आणावयास गेला तरी तलवार जवळ असावयाची च. मूळ विश्वासावर तलवार दिली होती, त्यांतून पुढें तलवारीवर विश्वास उत्पन्न झाला. तलवारीच्या नित्य सहवासानें तपावरची बुद्धि न कळत उडून गेली. साधु क्रूर बनला. इंद्राचें सिंहासन निर्भय झालें आणि अरण्यांतल्या हरिणांचें आसन कांपूं लागलें."

प्रत्येक वस्तूबरोबर तिचे सहचारी भाव येत असतात.

---

## शतकोटि रामायणाची वांटणी आणि शंकर : ३७ :

वाल्मीकीनें शतकोटि रामायण लिहिलें. तें लुटण्यासाठीं देव, दानव आणि मानव ह्यांच्यांत झगडा सुरू झाला. झगड्याचा निकाल लागेल असा सुमार न दिसल्यामुळें शंकरांना पंच नेमलें. त्यांनीं तिघांना तेतीस तेतीस कोटि श्लोक वांटून दिले. एक लाख उरले. असें उत्तरोत्तर वाटतां वाटतां शेंवटीं एक श्लोक उरला. रामायणाचा श्लोक अनुष्टुप् छंदाचा. अनुष्टुप् छंदाचीं अक्षरें असतात बत्तीस. शंकरांनीं त्यांतलीं दहा दहा अक्षरें तिघांना वांटून दिलीं. उरलीं अक्षरें दोन, तीं कोणतीं ? 'राम'. वांटणी करण्याची

मजुरी म्हणून शंकरांनीं तीं दोन अक्षरें स्वतः घेऊन टाकलीं. शंकरांनीं आपलें साक्षरत्व दोन अक्षरांत संपवून टाकलें. म्हणून देव, दानव आणि मानव कोणी हि त्यांच्या ज्ञानाची बरोबरी करूं शकत नाहीं.

म्हणून च संतांनीं साहित्याचें सर्व सार राम-नामांत आणून ठेवलें आहे.

---

## औषध आणि कुदळ : ३८ :

एक माणूस औषध खाऊन खाऊन कंटाळून गेला. कारण, जों जों औषध जवळ करावें तों तों आरोग्य दूर दूर पळूं लागलें. शेंवटीं कोणाच्या तरी सूचनेवरून त्यानें शेतांत काम सुरू केलें. शेतांतल्या कामानें आरोग्य लाभून थोड्या च दिवसांन तो मोठा तगडा झाला. अनुभवानें सिद्ध झालेली ही आरोग्याची साधना तो लोकांना सांगूं लागला. एखाद्याच्या हातांत बाटली पाहिली कीं "बाटलीनें कांहीं व्हावयाचें नाहीं, कुदळी घे, म्हणजे आराम मिळेल" असा तो मनोभावानें उपदेश करी.

---

## युक्लिड आणि राजा : ३९ :

भूमितीची मांडणी पहिल्या प्रथम युक्लिडनें केली असें सांगतात. युक्लिड हा ग्रीसचा राहणारा. तो ज्या काळांत होऊन गेला त्या काळीं ग्रीस देशांतल्या सर्व शिकलेल्या लोकांचीं डोकीं राजकारणानें भरून गेलेलीं होतीं. किंवा त्यांच्या डोक्यांत राज-कारणाचे बटाटे भरले होते असें म्हटलें तरी चालेल. त्यामुळें

भूमितीची कदर करणारा प्राणी दुर्मिळ च झाला होता. आणि युक्लिड तर भूमितीवर फिदा होता. तथापि आज ज्याप्रमाणें चरख्यावर फिदा झालेल्या एका माणसानें बऱ्या च मुत्सद्दी लोकांना डोकें खाजवावयास लावलें आहे त्याप्रमाणें युक्लिडनें हि पुष्कळ राजकारणी लोकांना रेघोटचा काढावयास लावलें होतें. दररोज युक्लिडच्या घरीं भूमिती शिकावयास आलेल्या लोकांचा फड जमत असे आणि युक्लिड आपले शोध कुशलतेनें समजावून सांगत असे. बरेचसे राजकारणी लोक अशा प्रकारे युक्लिडच्या नादीं लागलेले पाहून एका राजाला वाटलें, "आपण हि जाऊन पहावें, फायदा होईल." तो युक्लिडपाशीं येऊन एक हप्ताभर भूमिती शिकला. शेंवटीं त्यानें युक्लिडला विचारलें, "मी आज सात दिवस झाले भूमिती शिकतों ह्याचा फायदा काय ?" युक्लिड गंभीरपणें आपल्या एका शिष्याला म्हणाला, "अरे, ह्याला रोजीं चार आणेप्रमाणें सात दिवसांचे पावणे दोन रुपये देऊन टाक पाहूं." नंतर त्या राजाकडे वळून म्हणतो, "तुमचें ह्या हप्त्याचें काम संपलें आहे. तुम्ही उद्यांपासून दुसरीकडे काम बघा." मुत्सद्दी राजा खजील होण्याऐवजीं पावणे दोन रुपये हातांत पडल्यामुळें खुश झाला असेल काय ? आपली मनोवृत्ति ह्या राजासारखी बनली आहे. प्रत्येक गोष्टींत फायदा पाहण्याची संवय पुष्कळांना जडून गेली आहे.

---

## चांडाळाची गोष्ट : ४० :

आचार्यांच्या चरित्रांतली चांडाळाची गोष्ट अशीः—आचार्य एकदां काशीला जात असतांना त्यांच्या वाटेवरून एक 'चांडाळ'

वा. क्र. ११५००



येत होता त्याला त्यांनीं दूर होण्याविषयीं सांगितलें. तेव्हां तो चांडाळ त्यांना म्हणतो, "महाराज आपल्या अन्नमय शरीरापासून माझ्या अन्नमय शरिराला आपण दूर करूं इच्छितां कीं आपल्यांतील चैतन्यापासून माझ्यांतील चैतन्याला दूर करूं इच्छितां? कोणाचा झाला तरी देह बोलून चालून 'विटाळाचा गोळा' आहे आणि आत्मा तर सर्वत्र एक असून अत्यंत शुद्ध आहे. अशा स्थितींत अस्पृश्यता कोणाची आणि कोणाला?" असा त्याच्या प्रश्नाचा भाव, पण इतका भाव सूचवून तो चांडाळ स्वस्थ बसला नाहीं. त्यानें पुढें आणखी कानउघाडणी चालविली; "गंगाजलांतील चंद्र आणि आमच्या तळ्याच्या पाण्यांतला चांदोबा ह्यांत कांहीं फरक आहे काय? सुवर्ण-कलशांतलें आकाश आणि मातीच्या मडक्यांतली पोकळी ह्यांत अंतर आहे काय! सगळीकडे आत्मा एक च आहे ना? मग हा ब्राह्मण आणि हा अंत्यज असला भेदभ्रम तुम्हीं कोठून काढला?" "**विप्रोऽयं श्वपचोयऽमित्यपि महान् कोऽयं विभेदभ्रमः।**" इतकी कानउघाडणी झाल्यावर आचार्यांचे कान च नव्हे पण डोळे हि साफ उघडले. आणि नम्र भावानें त्याला नमस्कार करून ते म्हणाले,—"आपल्यासारखा मनुष्य, मग तो चांडाळ असो किंवा ब्राह्मण असो, मला गुरूच्या ठिकाणीं आहे. "**चांडालोऽस्तु स तु द्विजोऽस्तु गुरुरित्येषा मनीषा मम।**"

ह्या गोष्टीवरून काय अनुमान काढावयाचें तें वाचकांनीं च काढावें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम 2/975 वि: 1२0/४/
नों: दि: 24/12/6

प्रकाशक :

**भाऊ पानसे**

परंधाम विद्यापीठ, पवनार, वर्धा.

★

मुद्रक :

**मोहनलाल भट्ट**

राष्ट्रभाषा प्रेस, हिंदीनगर, वर्धा.